# Washim District Police

**Nature of Work** :- Recovery of stole property

**Police Station** :- Malegaon

**Date of Good Work done** :- 08/11/2022

**Brief of the work done :-**

दुचाकी चोरांकडून 12 दुचाकी जप्त ; सराईत मोटार सायकल चोर पोलिसांच्या ताब्यात.

## दोन चोरट्यांकडून बारा मोटर सायकल जप्त

- मालेगांव पोलीसांची कामगिरी
- दोघांना अटक तीन दिवसाची पोलीस कोठडी



देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगाव** ▪ पोलीसांनी दोन चोरट्यांकडुन एकुण १२ मोटर सायकल हस्तगत केल्या असून, त्यांना येथील न्यायालया समोर उभे केले असता त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या चोरट्यांमधे तालुक्यातील एक जण पांगरी कुटे येथील असुन दुसरा बुलढाणा जिल्ह्यातील रोहीण खेड येथील रहीवासी आहे. त्यांच्या कडुन मोटारसायकल चोरट्यांचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता पोलीस सुत्रांनी वर्तवली आहे.

पांगरी कुटे येथील संतोष गजानन इंगोले वय २५ वर्ष हा चोरीची मोटर सायकल घेऊन गावात वावरत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहीतीवरून मालेगाव पोलिसांनी ठाणेदार किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर चोरट्याच्या मागे पोलीस पथक लावून त्याच्या घरामधून त्याला ताब्यात घेतले व त्याचे जवळ असलेल्या मोटर सायकलचा इंजिन क्रमांक व चेचीस क्रमांकाची तपासणी केली. असता सदरची मोटरसायकल पोलीस स्टेशन मालेगाव मध्ये अपराध क्रमांक ४१२/२२ ३७९ भादवी मधील एम एच २८ ए के ०९७२ स्प्लेंडर प्लस असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी आरोपी संतोष इंगोले यास मोटरसायकल सह ताब्यात घेतले.इतर चोरलेल्या मोटरसायकल बाबत त्याचे कडून विचारपूस केली असता त्याने यापूर्वी सुद्धा मालेगाव तालुक्यामधून व आजूबाजूचे परिसरामधून इतरही मोटरसायकल चोरल्याची कबुली दिली. त्याने त्या सर्व मोटरसायकल त्याचा ओळखीचा साथीदार नामे मोहम्मद राजीक शेख महमूद व ४१ वर्ष रा रोहिणखेड ता मोताळा जिल्हा बुलढाणा यास दिल्याचे सांगितले. त्यावरू मोहम्मद राजीक शेख याला त्याचे गावातून ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी आरोपी संतोष गजानन इंगोले यांच्याकडून एकूण ३ मोटरसायकल व मोहम्मद राजी क शेख मेहमूद याच्या ताब्यामधून एकूण ९ मोटरसायकल ताब्यात घेण्यात आल्या. अशा एकूण १२ मोटरसायकल ताब्यात घेऊन त्या पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आल्या आहेत. सदर हस्तगत केलेल्या मोटरसायकलच्या मूळ मालकांचा शोध घेऊन त्यांना रीतसर त्या ताब्यात देण्याची प्रक्रिया मालेगाव पोलिसांकडून करण्यात येत आहे. दोन्ही आरोपींना विद्यमान न्यायालयाकडून तीन दिवसाचा पीसीआर मंजुर करण्यात आला आहे. त्यांनी अजून कोण कोणत्या भागात मोटरसायकलची चोरी केली असून या रॅकेटमध्ये आणखीन कोण कोण सहभागी आहेत याचा शोध मालेगाव पोलीस करत आहेत. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अप्पर पोलीस अधीक्षक गोरख भांबरे ,उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पुजारी यांचे मार्गदर्शनाखाली मालेगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार किरण वानखडे , सपोनी तानाजी गव्हाणे , एएसआय रवी सैबेवार ,पोहेका कैलास कोकाटे ,पोहेका प्रशांत वाडणकर, पोहेका अनिल कांबळे , पोका अमोल पाटील पो का जितू पाटील हे करत आहेत .(श.प्र.)

मोटरसायकल त्याचा ओळखीचा साथीदार नामे मोहम्मद राजीक शेख महमूद व ४१ वर्ष रा रोहिणखेड ता मोताळा जिल्हा बुलढाणा यास दिल्याचे सांगितले. त्यावरू मोहम्मद राजीक शेख याला त्याचे गावातून ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी आरोपी संतोष गजानन इंगोले यांच्याकडून एकूण ३ मोटरसायकल व मोहम्मद राजी क शेख मेहमूद याच्या ताब्यामधून एकूण ९ मोटरसायकल ताब्यात घेण्यात आल्या. अशा एकूण १२ मोटरसायकल ताब्यात घेऊन त्या पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आल्या आहेत.